# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

### मुंबईतील अतिवृष्टीत बाधित झोपडपट्टीधारकांकरिता बांधलेल्या कोहीनूर सिटी इमारतीमध्ये पुनर्वसनाबाबत

**(१) ८७२ (०३-०४-२०२०). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदी लगतच्या क्रांती नगरातील दिनांक २६ जुलै, २००५ मध्ये वा त्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीत बाधित झोपडपट्टीधारकांकरिता बांधलेल्या कोहीनूर सिटी इमारतीमध्ये अद्याप त्यांचे पुनर्वसन करण्यात आले नसल्याचे माहे जानेवरी,२०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) भारतीय विमानपत्तन प्राधिकरण व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. याच्या दरम्यान दिनांक ०४.०४.२००६ रोजी विमानपत्तनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडी धाराकांचे पुनर्वसन करण्याचे निश्चित झाले होते. सदरच्या पुनर्वसनाबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास समन्वये संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. करानाने पुनर्वसनाकरीता आवश्यक असणाऱ्या सदनिका मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू त्यांच्याकडे सदनिका उपलब्ध नसल्याने तसेच पुनर्वसनाचे कामास गती देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिनांक २९.०६.२०२१ च्या अधिसूचनेद्वारे कलम ३७ (१कक) (ग) नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास पुनर्वसनाकरीता सक्षम प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रिमीयर कंम्पाऊंड, कुर्ला (पश्चिम) येथे पुनर्वसन सदनिका "जसे आहे तशा" स्थितीमध्ये दिनांक २८.०७.२०२१ रोजी प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.
प्राधान्य सूचि व प्राधान्य सूचि व्यतिरिक्त असे एकूण ३१३९ झोपडीधारक पुनर्वसनासाठी पात्र ठरलेले आहे. क्रांतीनगर येथील ६०७ पात्र झोपडीधारकांपैकी २२१ झोपडीधारकांची सोडत काढण्यात आली आहे. त्यापैकी ३४ झोपडीधारकांचे विवरणपत्र व ताबा पावती देण्यात आलेली आहे.
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत पुनर्वसनासाठी प्राप्त झालेल्या सदनिका या सुस्थिती व राहण्यास योग्य नसल्यामुळे त्यांचे दुरुस्ती करण्याचे काम सुरु असून या सदनिका तयार झाल्यानंतर उर्वरित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल.

---

### मुंबई शहराला नैसर्गिक आपत्तीपासून वाचविण्यासाठी मुंबई भोवती तटबंदी बांधण्याबाबत

**(२) ३२८३४ (१२-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वातावरण बदल आणि तापमान वाढीमुळे समुद्राच्या पातळीत वाढ होऊन समुद्र किना-यावरील शहरे

पाण्याखाली जाण्याचे भाकित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत भरतीच्या वेळी अनेक भागात पाणी साचून मुंबई जलमय होण्याची शक्यता असल्याने तसेच वातावरणीय बदलांमुळे निर्माण होणा-या संभांव्य समस्यांना तोंड देण्यासाठी निश्चित आराखडयाची गरज असून त्यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जल प्रलयापासून मुंबईला सुरक्षित ठेवण्यासाठी गत काही वर्षांत वारंवार आलेल्या नैसर्गिक आपत्तींची दखल घेऊन भविष्यात त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी मुंबईभोवती तटबंदी बांधण्याचा उपाय मुंबई फर्स्ट या विचारमंचाने शासनाला सूचित केल्याचे दि. ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२२) :** (१) संयुक्त राष्ट्राच्या आयपीसीसी (IPCC) माहे ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालानुसार प्रामुख्याने
अ) कार्बन डायऑक्साईड व इतर हरितगृह वायूंच्या अमर्याद उत्सर्जनामुळे २१ व्या शतकात तापमान हे १.५° से ते २° से ने वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.
ब) तसेच सदर तापमान वाढीमुळे समुद्र पृष्ठभागाच्या तापमानातही वाढ होऊन जागतिक पर्जन्य चक्रावरही परिणाम होणार असल्याचे सूचित केलेले आहे.
(२) व (३)
अ) राज्यशासन "मुंबई फर्स्ट" या संस्थेसह या विषयात कार्य करणाऱ्या सर्वांशी, विचारांची देवाणघेवाण करीत असते. TERI सारख्या या विषयात कार्यरत संस्थेसह महाराष्ट्र राज्याचा वातावरणीय बदलांचा अभ्यास करून कृती आराखडा तयार केला आहे.
ब) ''मुंबई फर्स्ट'' या संस्थेने मा. माजी मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ रोजी सादर केलेल्या निवेदनाद्वारे उपाय-योजना प्रस्तावित केल्या होत्या.
(४) मुंबई शहरात पुरजन्य परिस्थिती उदभवू नये म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई शहराची १२१ पाणलोट क्षेत्रात विभागणी करुन संपुर्ण जलवाहिन्या प्रणालीचा अभ्यास करुन त्यातील कमतरतांचा अभ्यास करुन ब्रिमस्टोवॅड अहवाल तयार केलेला असून शहरामध्ये भूमिगत नाले, गटारे व पेटिका नाले यांचे संवर्धन व पुनवर्सन, नवीन पर्जन्य वाहिनींचे आरसीसी मध्ये बांधकाम, नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण, पर्जन्य जल उदंचन केंद्रांचे बांधकाम इ कामे करण्यात येत आहेत. जेणे करुन पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र राज्याचा हवामान बदलासम्बधीचा कृती आराखडा (State Action Plan on climate (Change SAPCC) मध्ये मुंबई शहरासंबंधित पाऊस. पूरजन्यस्थितीबाबत अभ्यास करण्यात आलेला असून त्यानुषंगाने उपाययोजनाबाबत राबवावयाच्या (Integrated Flood Management Plan for Mumbai City) शिफ़ारस करण्यात आलेली आहे. सदरच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फ़त कार्यवाही होत आहे. याशिवाय कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यात चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान विचारात घेऊन कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प या प्रकल्पास दि.१० नोव्हेंबर २०२१ रोजी राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून त्यामध्ये प्रतिबंधात्मक बंधारे बांधणे, भूमिगत विद्युत वाहिन्या विकसित करणे, बहूउद्देशिय चक्रीवादळ निवारा केंद्र व अटकाव यंत्रणा उभारणे. तसेच दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात हवामान बदलाविषयक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणेबाबत

**(३) ३३१३१ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत माहे जुलै, २००५ मध्ये झालेली अतिवृष्टी तसेच सन २०१९ व २०२१ मध्ये कोकण प्रदेश व दक्षिण महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि महापुर याबाबींचा विचार करता हवामान बदलाविषयाचा अभ्यास करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवामान बदलाचा अभ्यास करुन संशोधन करण्यासाठी राज्यात हवामान बदलविषयक विद्यापीठ (Climate change University) स्थापन करण्याबाबत शासनाकडे पुणे येथील एमआयटी शिक्षण संस्थेने प्रस्ताव सादर केला असल्याचे दि. १५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यापीठ उभारणीसाठी सातारा जिल्हयातील फलटण येथे आवश्यक ती जागा व अनुषंगिक संसाधने उपलब्ध करुन देण्याबाबत विधानमंडळाच्या मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या पुणे येथील वर्धापन कार्यक्रमाचे वेळी मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे येथील एमआयटी शिक्षण संस्थेने शासनाकडे तसा प्रस्ताव केव्हा सादर केला आहे व शासनस्तरावर हवामान बदलासाठी बळकट धोरणात्मक उपायाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच विद्यापीठ उभारणीबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२२) :** (१) होय,

(२) पुणे येथील एम.आय.टी. शिक्षण संस्थे मार्फत हवामान बदल विषयक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव कोणत्याही शासन यंत्रणेकडे दाखल केला नसल्याचे कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेट्रो प्रकल्प भंडारा रोड ते भंडारा शहरापर्यंत मंजुर करणेबाबत.

**(४) ३३२४८ (०२-०२-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते भंडारा (जिल्हा) रोडपर्यंतच्या मेट्रो प्रकल्पास राज्य शासनाने मंजूरी प्रदान करण्यात आली असून, रेल्वेचे ब्रोडगेज रेल्वे रूट नियोजित असून दळणवळण रोजगाराच्या समस्या बिकट असल्याने जनतेला भंडारा ते नागपूर प्रवास करणे व रोजगार निर्मीतीला चालना आणि रोजगारात वाढ, उद्योग व्यवसाय वृध्दी होणार असल्याने नागपूर ते भंडारा रोड व भंडारा रोड ते भंडारा शहरापर्यंत मेट्रो स्टेशनची नितांत आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प मंजुरीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगर विकास मंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना बैठक आयोजित करून मंजुरी द्यावी अशी मागणी दिनांक २४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुरी प्रदान करण्याबाबत व प्रकल्पाचा प्रस्ताव विचाराधीन असल्यास शासनाने कार्यवाही संदर्भात कोणते निर्देश संबंधीत यंत्रणेला देण्यात आले वा देण्यात येत आहे अथवा कार्यवाही कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे. याबाबत चौकशी करुन उपरोक्त मेट्रो प्रकल्प भंडारा रोड ते भंडारा शहरा पर्यंत मंजुरी संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.
नागपूर आणि जवळपासच्या उपग्रह शहरांदरम्यान अस्तित्वातील भारतीय रेल्वे मार्गांवर (नागपूर ते वर्धा, नागपूर ते नरखेड, नागपूर ते रामटेक) ब्रॉड-गेज मेट्रो ट्रेन सुरू करण्याबाबत भारतीय रेल्वे, महाराष्ट्र शासन आणि महा-मेट्रो यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. महामेट्रोमार्फत सादर करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र शासनाने माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये मान्यता दिली आहे व मंजुरीसाठी भारत सरकारकडे सादर करण्यात आला आहे. सद्यस्थिती सदर प्रस्तावा केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.
तसेच दिनांक १४.१०.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत केंद्र व राज्य शासन यांच्या ५०:५० टक्के आर्थिक सहभागाने भंडारा रोड ते भंडारा शहरापर्यंत ब्रॉड गेज मेट्रो उभारण्यासाठीचा प्रस्ताव महारेलने तयार करुन गृह (परिवहन) विभागामार्फत राज्य शासनाच्या मार्फत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, तारोडी, पाली या समुद्र किनारी वसलेल्या गावांना वीज पुरवठा उपलब्ध करण्याबाबत**

**(५) ३३२५८ (१८-०१-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईदंर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, तारोडी, पाली हि गावे समुद्र व खाडी किना-यावर वसलेली असल्यामुळे सागरी क्षेत्र नियंत्रात येत असल्याने सदर गावांना वर्षानुवर्षे वीज पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा जोडणीकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२० पासून अनेक वेळा प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे पाठपुरावा केला असूनही निर्णयात्मक कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने उत्तन, चौक, तारोडी, पाली या गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा व मुलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली व केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) मिरा भाईंदर महानगरपालिका व मे. अदानी इलेक्ट्रीसिटी यांचेकडील अहवालानुसार, उत्तन, चौक, तारोडी, पाली परिसरात अंशत: विद्युतीकरण झालेले आहे.
(२) व (३) सि. आर. झेड क्षेत्रातील वीज जोडणी करण्याबाबत महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (MCZMA) दि.०२.०८.२०१९ रोजी १३६ व्या बैठकीत धोरणात्मक झाला असून दि.१४.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मे. अदानी इलेक्ट्रीसिटी यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील तलावांचे संवर्धन व सुशोभीकरणासाठी खर्च झालेला निधी मिळणेबाबत**

**(६) ३३५१९ (१२-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने राज्य सरोवर योजनेअंतर्गत तलावांचे संवर्धन व सुशोभीकरणासाठी मंजुरी देण्यात आलेल्या तलावांची कामे पूर्ण होवून निधीची मागणी करूनही उर्वरित निधी वितरीत न केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार उर्वरित निधी वितरीत न होण्याची सर्व साधारण कारणे काय आहेत तसेच सदरचा निधी कधीपर्यंत वितरीत होणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) व (२) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेंच्या मार्गदर्शक तत्वानुसार विभागास प्राप्त होणा-या तलाव संवर्धन प्रस्तावांची छाननी करून सदर प्रस्ताव सूकाणू समितीसमोर सादर करण्यात येतात. सुकाणू समिती परिपूर्ण प्रस्तावांची अंतिम किंमत ठरवून निधी वितरित करण्याबाबत विभागास शिफारस करते.

सुकाणू समितीने शिफारस केलेल्या तलाव संवर्धन प्रस्तावास शासनाच्या मान्यतेने निधी टप्प्याटप्प्यात वितरित करण्यात येतो. शासनामार्फत वितरित केलेला निधी खर्च झाल्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपयोगिता प्रमाणपत्र, उर्वरित निधीचे मागणीपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यावर निधीचा पुढील टप्पा वितरित करण्यात येतो.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास यापूर्वी मंजूरी दिलेल्या तलावांबाबत प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्र व मागणीपत्राच्या अनुषंगाने निधीचा पुढील टप्पा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील खारेगांव टोलनाका ते गायमुख – घोडबंदर या कोस्टल रोडसाठी खारफुटी क्षेत्र बाधित होणार असल्याबाबत**

**(७) ३४०४५ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील खारेगांव टोलनाका ते गायमुख – घोडबंदर या कोस्टल रोडसाठी खारफुटी क्षेत्र बाधित होणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती क्षेत्र बाधित होणार आहे,तसेच खारफुटी क्षेत्र बाधित होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पासाठी एकूण १०.०३७७ हेक्टर इतके अधिसूचित व खाजगी कांदळवन क्षेत्र (खारफुटी क्षेत्र) बाधित होत आहे.

उक्त कांदळवन क्षेत्र कमीत-कमी बाधीत होण्याच्या हेतूने दि. १८.०३.२०२१ रोजी महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि आयुक्त, ठाणे महापालिका यांच्या संयुक्त बैठकीमध्ये गायमुख खाडी किनारी प्रकल्पामध्ये मोघरपाडा व भाईंदरपाडा येथील कांदळवन क्षेत्रामधील प्रस्तावित रस्त्याच्या संरेखनामध्ये बदल प्रस्तावित करून कमीत-कमी कांदळवन क्षेत्र बाधित होईल या दृष्टीकोनातुन प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार एमएमआरडीए व ठाणे महानगरपालिका यांचे स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन (सुधारित) धोरणास पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने मान्यता दिल्याबाबत**

**(८) ३४१५२ (१२-०१-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन (सुधारित) धोरणास पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे धोरण राज्यातील कोणत्या शहरामध्ये प्रामुख्याने लागू करण्यात येणार आहे व कधीपासून तसेच उक्त धोरणाच्या अंमलबजावणीसाठी किती रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे,

(३) असल्यास, सध्या महाराष्ट्रात नोंदणी असलेल्या वाहनांपैकी किती वाहने इलेक्ट्रीक आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर धोरण प्रामुख्याने मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या सहा शहरांमध्ये लागू करण्यात येणार आहे. उक्त अंमलबजावणीसाठी एकूण रु.९३० कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) महाराष्ट्र राज्यात माहे सप्टेंबर,२०२२ एकूण १,४०,२६० इतक्या इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील भूमिगत केबल १००/२२ के व्ही मोरीविली सब स्टेशन ते २२ के व्ही साईबाबा स्विचिंग स्टेशन पर्यंत असलेल्या कामाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(९) ३४५४३ (०२-०२-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वीज ग्राहकाची समस्या सुटावी म्हणून भूमिगत केबल १००/२२ के.व्ही.मोरीविली सब स्टेशन ते २२ के.व्ही.साईबाबा स्विचिंग स्टेशन पर्यंत असलेल्या कामाच्या प्रकल्पास मंजुरी मिळावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकत्याच आलेल्या चक्री वादळामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सदरचे काम झाले नसल्याने उल्हासनगर मधील नागरिकांना अंधारात बसावे लागल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी एम.एम.आर.डी.ए. कडून निधी उपलब्ध होत नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन प्रकल्पास निधी उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १७.०५.२०२१ रोजी सायंकाळी ६.३० वाजता आलेल्या वादळामुळे टाटा कांबा सबस्टेशन येथून येणाऱ्या २२ के.व्ही. विमको १ व विमको २ या फिडरचे २ टॉवर पडल्यामुळे साईबाबा स्विचींग स्टेशन येथून येणारा वीज पुरवठा खंडीत होता. तथापि, या काळामध्ये १०० के.व्ही. मोहने सबस्टेशन येथून येणारे एम २ फिडर व १७ सेक्शन स्विचींग स्टेशन येथून विद्युत पुरवठा घेऊन साईबाबा स्विचींग स्टेशनचा काही प्रमाणात वीज पुरवठा सुरु करण्यात आला होता.

(३), (४) व (५) सद्यस्थितीत १००/२२ के.व्ही. मोरीवली सब स्टेशन ते २२ के.व्ही. अंबरनाथ स्विचींग पर्यतचे भुमीगत केबलचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

---

**नामांकित शिक्षण संस्थामधून उच्च शिक्षण घेणा-या एससी,एसटी,ओबीसी केंद्र सरकाकडून मिळणारी आर्थिक मदत बंद करण्यात आल्याबाबत**

**(१०) ३४६०५ (१२-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामांकित शिक्षण संस्थामधून उच्च शिक्षण घेणा-या एससी,एसटी,ओबीसी (मागासवर्गीय विद्याथ्याकरिता) प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता केंद्र सरकाकडून मिळणारी आर्थिक मदत बंद केल्याबाबतचे परिपत्रक माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान केंद्र सरकारने प्रसिध्द केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिपत्रकामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या लाखो मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्र सरकारने काढलेल्या परिपत्रकाबाबत राज्य शासनमार्फत आर्थिक मदत त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील दिव्यांग, अनाथ निराधार लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणेबाबत

**(११) ३५००३ (१२-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांग, अनाथ निराधार, लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा व अनुदानाचा लाभ मागील ६ महिन्यांपासून प्राप्त झाला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध योजनांचा व अनुदानाचा लाभ मिळण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर चौकशीचे निष्कर्ष काय आहे त्यानुसार दिव्यांगांना योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) विविध योजनांच्या अनुदानासाठी शासनस्तरावरुन आयुक्तालयास दि.२४.१२.२०२१ रोजी तरतुद उपलब्ध झालेली आहे. सदर तरतुद जिल्हा कार्यालयांना वितरीत करण्यात आलेली आहे. जिल्हा कार्यालयस्तरावरुन दिव्यांग लाभार्थ्यांना अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ नुसार नगरविकास विभागाने दि.१०.०५.२०१८ नुसार व ग्रामविकास विभागाने दि.२५.०६.२०१८ नुसार शासन निर्णय निर्गमित करुन स्थानिक स्वराज्य संस्थांचा ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखीव ठेवणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडुन दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी वैयक्तीक व सार्वजनिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येत असून सदर योजनांचा लाभ दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिला जात आहे.
(३) आयुक्तालय स्तरावरुन राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी शासन स्तरावरुन दि.२४.१२.२०२१ रोजी निधी प्राप्त झालेला असुन प्राप्त झालेली तरतुद जिल्हा कार्यालयांना वितरीत करण्यात आलेली आहे. जिल्हा कार्यालय स्तरावरुन दिव्यांग लाभार्थ्यांना अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.तसेच नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्यसंस्थांकडुन दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी वैयक्तीक व सार्वजनिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येत असून सदर योजनांचा लाभ दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिला जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर महापालिकेच्या कर आकारणीमध्ये सुधारणा करणेबाबत

**(१२) ३५३९० (०२-०२-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर महापालिकेची कर आकारणी एकसारखी नसून एकाच प्रकारच्या आणि नजिक असलेल्या मालमत्तांसाठी निरनिराळा कर आकारला गेला असल्याने पालिकेच्या करसंकलनावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर महापालिकेच्या या करसंकलनातून प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याने कर आकारणीमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

करयोग्य मुल्य आधारीत पध्दती नुसार वर्ष २०१३ शिघ्र सिध्द गणक दराच्या आधारे मालमत्ता कर आकारणी केली जाते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाज कल्याण विभागातील शासकीय वसतीगृहासाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांच्या खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१३) ३५६०८ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतीगृहासाठी समाज कल्याण विभागाने केलेली सीसीटीव्ही आणि त्या संबंधित उपकरणांची खरेदी जादा भावाने केल्याचे माहे सप्टेबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकरणांची बाजारातील किंमत आणि खरेदीतील किंमत यामध्ये फार मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

सीसीटीव्ही खरेदी संदर्भातील अनियमिततेबाबत समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या संदर्भात उपआयुक्त(लेखा), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी सीसीटीव्ही आणि त्या सबंधित उपकरणाची खरेदी जादा भावाने केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नाही.

(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार खरेदीमध्ये अनियमितता आढळून आल्याने सबंधिताविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ई-वाहनांना चालना देण्याबाबत**

**(१४) ३५७०१ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ई-वाहनांना चालना देण्यासाठी शासनाने ई-वाहन खरेदीवर अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाअंतर्गत अनुदान दिलेल्या वाहनांची संख्या आणि अनुदानित रकमेचा तपशील देण्यात यावा तसेच राज्यात शासकीय कामकाजासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्याबाबत शासनाकडून मोहीम राबवली जात आहे काय,

(३) असल्यास, इंधनाच्या वाढत्या किंमतींमुळे छोटे टेम्पोचालक, रिक्षाचालक आपल्या वाहनांची इंजिन्स इलेक्ट्रिक किंवा सीएनजी मध्ये रुपांतरीत करण्यासाठी इच्छुक असल्यास अशा वाहनधारकांना शासनाकडून अनुदान देणार येणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण अंतर्गत अनुदान दिलेल्या वाहनांची संख्या आणि अनुदानित रक्कम खालीलप्रमाणे आहे.

१. इलेक्ट्रिक वाहन एकूण संख्या-१६८२४
२. इलेक्ट्रिक वाहन एकूण वितरीत अनुदान-रु.११८२७.९० लाख

(३) शासन निर्णय दि. २९.१२.२०२१ अन्वये, दि.०१.०१.२०२२ पासून शासकिय व निम शासकिय यंत्रना तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी ईलेक्ट्रिक वाहने असावीत. तसेच दि.०१.०४.२०२२ पासून शासकिय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक असतील, अशी तरतुद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी दिव्यांगाचा निधी वळविलबाबत

**(१५) ३६२८४ (१२-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील औंध येथील परिसरात ग्रामीण भागामध्ये दिव्यांगासाठी पुनर्वसन केंद्र उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिव्यांगाना देण्यात येणारा निर्वाह निधी व इतर विविध योजनांमधील सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा निधी वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिका व पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा वापराविना पडून असलेला निधी उपयोगी आणावा अशी मागणी ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांनी केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उपरोक्त कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
(लेखी मागणी नसुन तोंडी मागणी करण्यात आली आहे असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी अहवालांमध्ये नमुद केले आहे.)
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीने नियमबाह्य कार्यकारी अधिकारी पद भरल्याबाबत

**(१६) ३६४४९ (०२-०२-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीस शासनाचे वित्तीय व प्रशासकीय नियम लागू करण्यात आलेले असताना बाजार समिती आस्थापनेवर कोणतेही कार्यात्मक कामे नसताना प्रशासकीय कामासाठी गैरशासकीय व

शासकीय कार्यालयात कोणत्याही विभागात अस्तित्वात नसलेले 'कार्यकारी अधिकारी' हे पद निर्माण करून त्यावर ए.एस.श्रीवास्तव यांची वर्ग - ३ या पदावर राजपत्रित अधिकारी म्हणून नेमणूक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समितीने कार्यकारी अधिकारी पद निर्मितीसाठी शासनाची आणि प्रशासकीय विभागाची / एम.एम. आर.डी.ए . यांची मान्यता घेतलेली नाही, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, स्थानिक निधि लेखापरीक्षण विभागाच्या सन २००९ -१० ते २०१०-११ चा लेखा परीक्षण अहवाल परिछेद क्र.१७ मध्ये जे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीच्या वित्त विभागाचे कामकाज पाहण्याकरीता दिनांक ५ जानेवारी, १९९८ रोजीच्या बाजार समितीच्या सभेत सदर पद भरण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला. सदर पदाच्या मंजूरीस्तव प्रस्ताव उपाध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात आला असता, त्यास दिनांक ९ ऑक्टोबर, १९९८ रोजी मान्यता देण्यात आली असून श्री. ए. के. श्रीवास्तव यांना कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली. तथापि सदर पद हे अराजपत्रित आहे.

(२) हे, खरे नाही.

(३), (४) व (५) होय, हे खरे आहे,

तथापि, सह संचालक, स्थानिक लेखा परिक्षा, कोकण विभाग यांच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २००९-१० व २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणामधील परिच्छेद क्र. १७ वगळण्यात आल्याबाबत मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीस कळविण्यात आले आहे.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या नेतीवली कोवीड केंद्रावर त्रास सहन करावा लागत असल्याबाबत

**(१७) ३७६५२ (२०-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येणाऱ्या नेतीवली कोवीड केंद्रावर सामान्य जनतेला कोविड-१९ ची चाचणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून, सदरहू केंद्रावर कर्मचारी उपलब्ध नसल्याने कोवीड चाचणी होऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेथील केंद्रावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून मनमानी कारभार चालविला जात असून, जनतेशी देखील उर्मटपणे बोलले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील कर्मचारी त्यांच्या मर्जीतील व्यक्तीचे रिपोर्ट प्राधान्याने व वेगळे काढून पाठविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीत आढळून आलेल्या दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत नेतिवली येथील दवाखान्यात जुलै २०२० पासून कोविड तपासणीसाठी Collection सेंटर सुरू आले होते. सदर रूग्णालयात बाह्यसंस्थेमार्फत प्रयोगशाळा तंत्रज्ञांची नेमणूक करण्यात आली होती. सदर कर्मचारी कायम उपलब्ध रहात होते. सदर ठिकाणी RTPCR तपासणीसाठी संशयित रूग्णांकडून नमुने गोळा करून NIV, मुंबई येथे पाठविले जात होते.

• सदर रूग्णालयात प्रतिदिन ८०-१०० रूग्णांची Antigen तपाणसी करण्यात येत होती. तसेच, तपासणीचा अहवाल रूग्णांना तात्काळ देण्यात येत होता.

• RTPCR तपासणीचे नमुने नेतिवली दवाखाना येथून बाई रूक्मिणीबाई रूग्णालय येथे व तेथून NIV Haffkine Institute मुंबई येथे व मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व ठिकाणाहून नमुने RTPCR तपासणीसाठी पाठविण्यात येत होते. त्यामुळे चाचण्याचे अहवाल प्राप्त होण्यास काही काळ लागत असल्याने, रूग्णांना अहवाल देण्यास वेळ लागला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर कर्मचाऱ्यांवर नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचे नियंत्रण होते. तसेच, जनतेशी उर्मटपणे बोलल्याची बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) सदर ठिकाणी रूग्णांना अहवाल वेळेवर प्राप्त होत नव्हते. तसेच, त्यांच्या मर्जीतील व्यक्तींचे रिपोर्ट प्राधान्याने व वेगळे काढून पाठविले जात असल्याची बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई महानगरपालिका व इतर कांही क्षेत्रे वगळून इतर सर्व शहरांसाठी तसेच ग्रामीण क्षेत्रासाठी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या अंमलबजावणीबाबत**

**(१८) ३७७५४ (०९-०४-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागाच्या अधिसुचनेनुसार दिनांक ३ डिसेंबर, २०२० पासून मुंबई महानगरपालिका व इतर कांही क्षेत्रे वगळून राज्यातील इतर सर्व शहरांसाठी तसेच ग्रामीण क्षेत्रासाठी एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीची अंमलबजावणी सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमावलीनुसार गृहप्रकल्पांच्या सुविधा क्षेत्रात धार्मिक स्थळांच्या बांधकामांना परवानगी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नियमावलीनुसार कोणकोणत्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे व त्याचे एकुण स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे. शासनाने दि.०२.१२.२०२० च्या अधिसूचनेन्वये, त्यामध्ये नमूद केलेले क्षेत्र वगळता, राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रांसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मंजूर केली असून सदर नियमावलीची अंमलबजावणी दि.०३.१२.२०२० पासून सुरु झाली आहे.

(२) होय.

मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.१.३(७) व विनियम क्र.३.५ मध्ये सुविधा क्षेत्रासंदर्भात (Amenity Space) सविस्तर तरतुदी दर्शविण्यात आल्या आहेत. त्यानुसार, सुविधा क्षेत्रामध्ये धार्मिक स्थळ हा वापर अनुज्ञेय नाही.

(३) उक्त नियमावलीनुसार सुविधा क्षेत्रामध्ये खुली जागा, पार्क, खेळाचे मैदान, क्रिंडा संकुल, बगीचा, सुविधा दुकाने, पार्कींग लॉट, प्राथमिक व माध्यमिक शाळा, नर्सरी, हेल्थ क्लब, डिस्पेन्सरी, नर्सिंग होम, हॉस्पीटल, पोस्ट ऑफिस, पोलिस स्टेशन, इलेक्ट्रीक सब स्टेशन, बँक एटीएम, इलेक्ट्रॉनिक सायबर लायब्ररी, ओपन मार्केट गारबेज बिन, assisted living and hospice together, senior citizen housing and orphanage together, project affected persons' housing, auditorium, conventional centre, पाणीपुरवठा इलेक्ट्रीसिटी सप्लाय या सेवासुविधा अनुज्ञेय आहेत.

---

## राज्यातील वातावरणीय बदलामुळे कोकण किनारपट्टी व मुंबईला असलेला धोका लक्षात घेता उपाययोजना करणेबाबत

**(१९) ३८५२९ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोकण सागरी किनारपट्टी परिसर आणि दक्षिण मुंबईचा भाग सन २०५० पर्यंत वातावरणीय बदलामुळे पाण्याखाली बुडणार असल्याची माहिती संयुक्त राष्ट्राच्या इंटर गव्हर्नमेंटल ऑन क्लायमेट चेंज (IPCC) या संस्थेने सादर केलेल्या अहवालात नमूद केले असल्याने मुंबई शहर व कोकण किनारपट्टीचे संरक्षण करण्याकरिता राज्य शासनातर्फे वातावरणीय बदल परिषद स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने भविष्यात होऊ घातलेल्या संकटावर मात करण्यासाठी अद्याप पर्यंत संरक्षणात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला तसेच याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१२-२०२२) :** (१) संयुक्त राष्ट्राच्या आयपीसीसी (IPCC) माहे ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालानुसार प्रामुख्याने

अ) कार्बन डॉयऑक्साईड व इतर हरितगृह वायुंच्या अमर्याद उत्सर्जनामुळे २१ व्या शतकात तापमान हे १.५० ते २० ने वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.

ब) तसेच सदर तापमान वाढीमुळे समुद्र पृष्ठभागाच्या तापमानातही वाढ होऊन जागतिक पर्जन्य चक्रावरही परिणाम होणार असल्याचे सूचित केलेले आहे.

वातावरणीय बदलांमुळे होणाऱ्या परिणामांवर अनुकूलन (ॲडॅप्टेशन) व उपशमन (मिटिगेशन) करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली व मा. उपमुख्यमंत्री यांच्या सहअध्यक्षतेखाली २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे (शासन निर्णय क्रमांक मावअ २०२१/प्रक्र.१२१/तांक-१) महाराष्ट्र राज्य वातावरणीय बदल परिषद गठीत करण्यात आलेली आहे.

(२) वातावरणीय बदलांना सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाने सविस्तर वातावरणीय बदल कृती आराखडा तयार केला आहे. सदरहू कृती आराखडयाच्या अनुषंगाने ऊर्जा, वने, कृषि, जलसंपदा, ग्राम विकास, नगर विकास, आपत्ती व्यवस्थापन व आरोग्य अशा ८ विभागांकरिता विभागनिहाय कृती आराखडे तयार करून सादर करण्यात आले आहेत.

सदर कृती आराखडयातील ५० शिफारशींपैकी प्राधान्याने राबवावयाच्या एकूण १४ शिफारशींचा समावेश करून महाराष्ट्र राज्याचे वातावरणीय बदल अनुकूलन धोरण दि. २५/१०/१७ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे (शासन निर्णय क्र. बैठक-२०१३/प्र.क्र.६३/तां.क-१) निर्गमित करण्यात आलेले आहे. या १४ शिफारशींची अंमलबजावणी संबंधित विभागांनी आस्तित्वातील धोरणांमध्ये आवश्यक ते बदल किंवा नवीन धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार शासनाचे सर्व विभाग कार्यवाही करत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडार्ली (जि.ठाणे) गावात महापालिकेच्या डम्पिंग ग्राऊंडच्या प्रकल्पाला ग्रामस्थांसह १४ गाव संघर्ष समितीने विरोध दर्शविला असल्याबाबत

**(२०) ३८६३५ (१८-०४-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मौजे भंडार्ली येथील सर्वे क्रमांक १०४ मधील ३३,९४३.०० चौ.मी. (३,६५,२२७.०० चौ.फूट) ही जी श्री सद्रुदीन बशेर खान यांच्या मालकीची जमीन ठाणे महानगरपालिकेच्या अटी व शर्तीला अनुसरून कचरा विल्हेवाटीस देण्याची तयारी दर्शविल्यानंतर सदरहू जागेवर डम्पिंग ग्राउंड उभारण्याचे ठाणे महानगरपालिकेने निश्चित करून डम्पिंग ग्राउंड उभारण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डम्पिंग ग्राउंड उभारण्याचा घाट घातलेला असून सदरहू भंडार्ली येथील डम्पिंग ग्राउंड उभारण्यास १४ गाव संघर्ष समितीने, स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनीही प्रखर विरोध दर्शवून सदरहू डम्पिंग ग्राउंड प्रकल्प रद्द करण्याची मागणी मागील ४ महिन्यांपासून लेखी निवेदनाद्वारे मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, प्रधान सचिव, नगर विकास विभाग आदीकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महापालिकेने भंडार्ली गावात ४ हेक्टर जागा घेऊन त्या ठिकाणी डम्पिंग ग्राउंड उभारण्याची प्रक्रिया सुरू केल्यामुळे सदरहू १४ गाव संघर्ष समितीने या डम्पिंगला विरोध करीत आंदोलन करत ग्रामस्थ रस्त्यावर ठिय्या मांडून बसले होते, तरीही ठाणे महानगरपालिका डम्पिंग ग्राऊंडचा प्रकल्प भंडार्ली गावात राबविण्यात असल्याच्या निषेधार्थ पुन्हा दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी जन आक्रोश आंदोलन करून सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू भंडार्ली येथील १४ गावांच्या तसेच लोकप्रतिनिधींच्या प्रखर विरोध असताना, डम्पिंग ग्राऊंडचा प्रकल्प जबरदस्तीने राबविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर भंडार्ली डम्पिंग ग्राऊंडला असलेला प्रखर विरोध विचारात घेऊन पुनर्विचारार्थी सदरहू प्रकल्प विनाविलंब रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाचे धोरण काय राहणार आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) ठाणे शहराचा घनकचरा प्रश्न सोडविण्याकरीता ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर मौजे भंडार्ली येथे खाजगी मालकीची सर्वे क्र. १०४ मधील सुमारे अंदाजीत ३.४० हेक्टर जागेवर घनकचरा विल्हेवाट प्रकल्पाकरिता आवश्यक त्या सोयी-सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान सदर प्रकल्प उभारणीस त्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक नागरीकांचा विरोध आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर विरोधाच्या अनुषंगाने सर्व नागरिकांशी संवाद साधुन त्यांच्या शंकांचे निरसन करण्याची कार्यवाही केल्याची बाब  ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० ची अंमलबजावणी करण्याकरीता मौजे डायघर येथील १९ हेक्टर भूखंड घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याकरीता महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. सदर जागेवर सद्यस्थितीत उच्चदाबाच्या विद्युत वाहिन्या गेलेल्या आहेत. सदर वीज वाहिन्या स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरू असून सदर प्रक्रियेस काही कालावधी लागणार असल्याने मौजे भंडार्ली येथे एक वर्षाकरीता घनकचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी पर्यायी व्यवस्था तयार करण्यात येत आहे.

मौजे डायघर येथे प्रकल्प सुरू झाल्यानंतर मौजे भंडार्ली येथील घनकचरा प्रकल्प टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात येत असल्याची बाब  ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

---

## राज्यातील अनुसुचित जातीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाकडून संयुक्तपणे देण्यात येणा-या शिष्यवृत्तीबाबत.

**(२१) ३९१०० (०९-०४-२०२२). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसुचित जातीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून संयुक्तपणे देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे अर्ज नोंदणीसाठी १२ जानेवारी, २०२२ ही अखेरची तारीख, या अखेरच्या तारखेपर्यंत किती टक्के विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे व किती विद्यार्थी नोंदणी करण्यापासून वंचित राहीले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत राज्यात कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव सुरु असल्यामुळे ज्या अनुसुचित जातीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी  शिष्यवृत्तीकरीता ऑनलाईन नोंदणी केली नाही, त्या विद्यार्थ्यांना बाबत  शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) सन २०२१-२२ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मागिल वर्षाच्या तुलनेत सुमारे ८७% एवढे पात्र अर्ज नोंदणीकृत झाले होते. सन २०२१-२२ चे अर्ज नोंदणी करण्याकरीता दिनांक १५.९.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली होती.

(२) कोवीड -१९ महामारीचा प्रादुर्भाव राज्यात सर्वत्र असल्याने चालू शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालये व त्यामध्ये राबविण्यांत येणारे अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया उशिराने चालू झाली आहे. त्याअनुषंगाने चालू शैक्षणिक वर्षाकरीताचे शिष्यवृत्तीचे अर्ज राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणीकृत करण्याकरीता दि. १५ डिसेंबर, २०२१ पासुन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून आजपर्यंत त्यास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या वाढत्या मागणीच्या अनुषंगाने चालू शैक्षणिक वर्षाकरीताचे शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन नोंदणीकृत करण्याकरीता दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली असताना टोकन देवून अधिकची कामे केल्याबाबत**

**(२२) ३९२८८ (१८-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेची आर्थिकस्थिती डबघाईला आलेली असताना अर्थसंकल्पीय तरतूद नसतांना टोकन देवून अधिकची कामे केली असल्याचे माहे ऑगस्ट २०२१ मध्ये वा त्या दरम्यानच्या निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेकडे अर्थसंकल्पीय तरतूद नसताना अधिकच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याने विकास कामावर विपरीत परिणाम होवून तातडीच्या व आपत्तीच्या वेळेस महापालिकेचे बजेट कोलमडत असल्याने उपरोक्तप्रमाणे अधिकची कामे करणाऱ्या महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :**(१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुद नसताना टोकन देऊन अधिकची कामे करण्यात आली नाहीत.

तथापि, सन २०२१ मध्ये उद्भवलेले कोरोना महामारी व लॉकडाऊनच्या निर्बंधामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट होऊन कोरोना नियंत्रण उपाययोजनाकरीता आकस्मिक खर्चात वाढ झाल्याने महानगरपालिकेवर सदरचे दायित्व निर्माण झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन, महानगरपालिका स्तरावर हाती घेण्यात आलेल्या कामांपैकी अत्यावश्यक कामांना प्राथम्य क्रम देण्यात आला व कोरोना उपाययोजना / नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकाचे पद रद्द करण्याबाबत**

**(२३) ३९३२८ (१८-०४-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक श्री.सिद्धेश्वर मोगलप्पा कामूर्ती यांना रु.५०,००,०००/- लाखांची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभाग ठाणे यांनी त्यांना रंगेहात पकडून अटक केली त्यामुळे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याबाबत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने एकमताने ठराव क्र. ३९८पारित करून शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने श्री.सिद्धेश्वर मोगलप्पा कामूर्ती यांचे नगरसेवक पद रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी मा.नगरविकास मंत्री व प्रधान सचिव, नगरविकास यांना निवेदनान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक श्री.सिद्धेश्वर मोगलप्पा कामूर्ती यांचे नगरसेवक पद रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शेवटच्या फेरीत प्रवेश घेणाऱ्या पात्रताधारक विध्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ नाकारल्याबाबत

**(२४) ३९६१६ (०९-०४-२०२२). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी खाजगी विना अनुदानीत व कायम विना अनुदानित अभ्यासक्रमासाठी शेवटच्या फेरीत प्रवेश घेणाऱ्या पात्रताधारक अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ नाकारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेचे पात्रताधारक असल्याने त्यांच्यावर अन्याय दूर करुन त्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गृहनिर्माण संस्थेच्या इमारत बांधकाम/पुनर्विकासाठी देण्यात केलेल्या अतिरिक्त ५० टक्के सुट च्या कालमर्यादेस मुदतवाढ देण्याबाबत

**(२५) ४००१९ (१८-०४-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये गृहनिर्माण संस्थेच्या इमारत बांधकाम/पुनर्विकासासाठी देण्यात आलेली अतिरिक्त ५० टक्के सुट दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत कालमर्यादेस ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी मुंबईमधील लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयास किंबहूना गृहनिर्माण संस्थेच्या इमारत बांधकाम/पुनर्विकासाठी देण्यात केलेल्या अतिरिक्त ५० टक्के सुट च्या कालमर्यादेस मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) राज्य शासनाने, कोविड-१९ विषाणूच्या संक्रमणाचा धोका व जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेली जागतिक महामारी यांचा सारासार विचार करुन, राज्यात वेळोवेळी जाहीर केलेली टाळेबंदी आणि या सर्व बाबींमुळे जागतिक स्तरावर आर्थिक व औद्योगिक प्रगतीत आलेली आमुलाग्र शिथिलता या साऱ्यांच्या पार्श्वभूमिवर आर्थिक सुधारणांसाठी केलेल्या विविध उपाययोजनांपैकी एक म्हणजे रियल इस्टेट क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने शासनाने दि.१४.०१.२०२१ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणांना / जिल्हाधिकारी यांना, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी तसेच फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये ५०% सवलत देण्याबाबत त्याचप्रमाणे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाव्यतिरिक्त नियोजन प्राधिकरणांमार्फत तसेच इतर प्राधिकरणांमार्फत अन्य बाबींसाठी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये ५०% सूट देण्याबाबत नियोजन प्राधिकरणांनी / इतर प्राधिकरणांनी निर्णय घेण्याबाबत, काही अटींसह निदेश दिलेले होते. सदर निदेशानुसार दि.३१.१२.२०२१ पर्यंत प्रत्यक्ष जमा होण्याच्या अधिमुल्याच्या रकमेवर सूट अनुज्ञेय होती.
(२) दि.३१.१२.२०२१ पर्यंतचे मुदतीत नियोजन प्राधिकरणांना प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी होणे व मंजूरी होणे प्रलंबित असल्याची बाब विचारात घेऊन, अशा प्रकरणांमध्ये उक्त नमूद मुदतीत अधिमूल्य रक्कम भरणा करणे व्यावहारीकदृष्ट्या शक्य नसल्याने दि.३१.१२.२०२१ पर्यंत मंजूर प्रस्तांवासाठी अधिमूल्याची रक्कम प्रत्यक्ष भरणा करणेसाठी शासन निर्णय दि.३१.१२.२०२१ अन्वये, दि.१४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार भरणा करुन घ्यावयाच्या सवलतीच्या अधिमूल्याबाबतची प्रत्यक्ष भरणा करण्याची मुदत दि.१५.०१.२०२२ पर्यंत वाढविली होती. यानंतर कोविडची वाढती परिस्थिती व त्यामुळे कामकाजावर होणारा परिणाम यांचा विचार करुन दि.१४.०१.२०२२ रोजीच्या निदेशान्वये, सदर मुदत दि.१६.०१.२०२२ ते ३१.०१.२०२२ अखेरपर्यंत वाढविण्यात आली होती.
(३) आता असा कोणताही प्रस्ताव विचाराधिन नसल्याने, प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेतील पाणी पुरवठ्याबाबत

**(२६) ४०६१९ (२७-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील महापालिका क्षेत्राअंतर्गत असणाऱ्या गृहसंकुलामध्ये महापालिकेकडून होणारा पाणी पुरवठा अपुरा व कमी दाबाने होत असल्याने येथील रहिवाश्याची प्रचंड गैरसोय होत आहे त्यामुळे मोठ-मोठ्या गृहसंकुलांना लाखो रुपये खर्च करुन टॅकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन यावर कायमस्वरुपाची उपाययोजनेची हमी देऊनही माहे सप्टेंबर, २०२१ पासून आजतागायत त्याची अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा जलवाहिनीच्या देखभाल दुरुस्तीसाठीच्या शटडाऊन कालावधीमध्ये व त्यानंतर पुढील दोन ते तीन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होतो, ही वस्तुस्थिती आहे. तसेच अशा वेळी महापालिका क्षेत्रातील मोठ-मोठ्या गृहसंकुलांना टँकरने पाणी पुरवठा घ्यावा लागतो असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) ठाणे महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा वाढविण्याबाबत खालील कार्यवाही सुरू आहे:-
I. पिसे येथे उच्च क्षमतेचे पंप बसविण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी शटडाऊन घेणे आवश्यक आहे. यामुळे पाणी पुरवठ्यात व्यत्यय निर्माण होत आहे. मात्र सदरचे पंप बसविल्यानंतर वाढीव पाणी उचलण्याची क्षमता निर्माण होणार आहे.

II. ठाणे महानगरपालिकेने भातसा धरणातून अतिरिक्त १०० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाण्याचा कोटा वाढविण्याबाबत महानगरपालिकेचा जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.
III. ठाणे महानगरपालिकेस जलसंपदा विभागाच्या दिनाक २०.०७.२०२२ च्या पत्रान्वये ५० द.ल.लि प्रतिदिन पाणी कोटा तात्पुरत्या स्वरुपात मुमरी धरण होईपर्यंत उपलब्ध करुन दिलेला आहे.
IV. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ठाणे महानगरपालिकेस २० द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा उपलब्ध करुन दिला आहे.
V. सद्यस्थितीत ३० द.ल.लि. पाणीसाठा एम.आय.डी.सी.कडून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
VI. ठाणे महानगरपालिकेने रुपये ७२१ कोटीचे एकूण ९ प्रस्ताव सादर केले आहेत त्यातील ४५० कोटी रुपयाच्या वितरणवाहिनी सुधारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भिवंडी शिवाजी चौक, येथील भूमापन मिळकत क्र.३२८० बनावट मोजणी कार्यालय टिप्पणी हे सर्व बेबनाव करुन इमारत प्रस्ताव मंजूर होऊन त्या इमारतीस अडथळा आल्याबाबत**

**(२७) ४०८८५ (२५-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाव शिवाजी चौक (ता.भिवंडी) मौजे भिवंडी येथील भूमापन मिळकत क्र.३२८० बनावट मोजणी क्र.१४४/२००८ त्यावरुन बनवलेली मोजणी क्र.४३७/२०१५ ची दिनांक ८आक्टोंबर, २०१५ नगरभूमापनची कार्यालय टिप्पणी हे सर्व बेबनाव काम करुन इमारत प्रस्ताव मंजूर झाले व त्या अनधिकृत इमारतीस अडथळा येऊ नये म्हणून त्याच्यालगत असलेले एकूण ३० गाळे, हे १९९१ मध्ये रस्ता रुंदीकरणामध्ये ज्यांचे दुकाने, रहिवासी घर व गाळे तुटले होते, त्यांचे सदर नगरभूमापन मिळकतीमध्ये पुनर्वसन केले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३० गाळयांना नगरपालिकेने भिवंडी-कांबारोड-शिवाजी चौकलगतच्या स्मशानभूमीजवळ दुकानाचा वापर सुरु करण्यासाठी सदर गाळेधारकांना पुनर्वसित केले होते आणि त्यांना १९९२ ते २०२१ मध्ये वा त्यादरम्यान कायदेशीररित्या घरपट्टी वीजमिटर, पाणीपट्टी, शिक्षणकर इ. माध्यमातून गेले ३० वर्ष करवसूली केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, कनक रिअल्टीचे विकास तसेच तोतया पोलिस, सरकारी अधिकारी / कर्मचारी असे पन्नास एक लोकांना घेऊन विकासकाच्या सांगण्यावरुन ५० लाख रुपयाच्या गैरव्यवहारातून सदरचे गाळे तोतया पध्दतीने घरफोडीची कारवाई करुन ५ कोटी रुपयाचे मुद्देमाल चोरुन नेले त्यांच्यामुळे गाळेधारक बेरोजगार होऊन रस्त्यावर आल्याने त्यांच्यावरती उपासमारीची वेळ आल्याने, गाळेधारकांना कुटुंब चालविणे कठीण होत असल्याने आत्महत्येस प्रवृत्त होत असून गाळेधारकांची जिवितहानी झाल्यास त्यांस सर्वस्वी जबाबदार आयुक्त भिवंडी महापालिकेची राहिल, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, सदरचे गाळे तोतया पध्दतीने तोडल्याने त्यास महानगरपालिका जबाबदार असून त्यांचे त्याच ठिकाणी पुन्हा पुनर्वसन करुन देण्यात यावे व निजामपूरा पोलिस स्टेशन यांनी या संपूर्ण बनावट प्रकरणाला संरक्षण देऊन कायदा व सुव्यवस्था बिघडवल्याने या संबधित प्रकरणावर कारवाई करण्यासाठी दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गाळेधारकांनी पोलिस आयुक्त व उपायुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना असे अनेक निवेदन देऊनही कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संबधित अधिकृत गाळेधारकांचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी घरफोडी करुन ५ कोटीचे ऐवज लंपास केल्याने त्यांना निलंबित करुन त्यांच्यावरती गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय,
(६) असल्यास, अधिकृत गाळेधारकांना पुनःश्च त्याच ठिकाणी पुर्नःस्थापित करुन संबधित विकासकाच्या बनावट मोजणी, इमारत पूर्ण न होताच दिलेल्या इमारत वापराचा दाखला तात्काळ रद्द करण्यासाठी विकासकास दिलेली अनियमित परवानगी याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने अतितातडी हद्द कायम मोजणी नकाशा (मो.रं.न.) ४३७/२०१५ हा पडताळणी करुन तद्नंतर बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार कागदपत्रांची छाननी करुन सि.स.३२८० जागेतील बांधकामास भागश: पुर्णत्व दाखला दिला असल्याची बाब कळविली आहे.

तसेच नगर भूमापन क्र. ३२८० च्या मोजणी प्रकरणांचे नकाशे व मूळ नगर भूमापन अभिलेख व शेत जमीनीचे अभिलेख यामध्ये असणाऱ्या क्षेत्राच्या तफावतीचे अनुषंगाने नियमांतर्गत तपासणी / चौकशी करुन योग्य ती दुरूस्ती करण्याच्या व चौकशीअंती दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबत उपसंचालक भूमी अभिलेख, कोकण प्रदेश यांना सूचित केले असल्याची बाब महसुल विभागाने कळविली आहे.

तसेच शिवाजी चौक परिसरात तत्कालीन नगरपालिकेने सन १९९१-९२ साली रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या नागरिकांना नगरपालिकेच्या दिनांक १७.०३.१९९२, दिनांक १२.१०.१९९८ च्या ठरावान्वये एकूण ३५ गाळयांचे पुनर्वसन केले होते.

(२) तत्कालीन नगरपालिकेने भिवंडी-कांबारोड-शिवाजी चौकलगतच्या स्मशानभूमीजवळ पुनर्वसित केलेल्या गाळेधारकांपैकी फक्त ०७ गाळेधारकांचे करनिर्धारण करुन कर संकलन करण्यात येत असल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) हे खरे नसल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४), (५) व (६) सदर विषयाबाबत अर्जदार श्री.रामु नागो भोईर व इतर यांनी पोलीस उपायुक्त यांच्याकडे दिनांक २४.१२.२०२१ रोजी तक्रार केली होती. सदरची तक्रार त्यांनी पुढील कार्यवाहीसाठी दिनांक ०४.०२.२०२२ रोजी महानगरपालिकेस अग्रेषित केला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच यापूर्वी भिवंडी महानगरपालिकेने भोगवटाधारकांनी कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्यासाठीची पुरेशी कागदपत्र उपलब्ध करुन न दिल्यामुळे निष्कासनाची कार्यवाही केली होती.

तथापि, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या संबंधितांनी सदर निष्कासनाची कार्यवाही विहित प्रक्रिया न अवलंबता केल्याने संबंधित कर्मचाऱ्यांचे निलंबन करुन विभागीय चौकशी सुरू केल्याची बाब भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(७) प्रश्न उद्धवत नाही.

---

## ठाणे शहरात राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट सिटीतील गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(२८) ४०९१५ (२५-०५-२०२२). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट सिटी योजनेतील काही कामांमध्ये गैरव्यवहार व बहुसंख्य कामे संथगतीने सुरु असल्याचे तक्रारदारांनी निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठाणे स्मार्ट सिटीतील गैरव्यवहारांची चौकशी करुन २७ जानेवारीपर्यंत प्रत्यक्ष कृती अहवाल (ॲक्शन टेकन रिपोर्ट) पाठविण्याचे आदेश स्मार्ट सिटी मिशन चे संचालक यांनी राज्याच्या मुख्य सचिव यांना देण्यात आल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानूसार स्मार्ट सिटी प्रकल्पातील कामांची चौकशी सुरु करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) ठाणे स्मार्ट सिटी अभियानांतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या चौकशीच्या अनुषंगाने मुख्य सचिव कार्यालयास दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी केंद्र शासनाकडून ईमेल संदेशाव्दारे पत्र प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४) व (५)
• ठाणे शहरात राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट सिटी अभियानाबाबत मा. विधानसभा सदस्य व इतर यांच्या तक्रारीस अनुसरुन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडून सविस्तर खुलासा मागविण्यात आला असून त्यांचेकडून खुलासा शासनाकडे प्राप्त झाला आहे. सदर खुलाशास अनुसरुन शासन स्तरावरील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका क्षेत्रात भुयारी मार्ग किंवा ओव्हर ब्रिज तयार करण्याबाबत**

**(२९) ४११७८ (३१-०३-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातल भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका क्षेत्रातून जाणाऱ्या तानसा पाईप लाईन मुळे कल्याण सर्व्हिसरोड वरून भिवंडी शहरातील मोठ्या प्रमाणात नागरिक वस्ती असलेल्या शांती नगर परिसरात ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे स्थानिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ सप्टेंबर २०२१ रोजी आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका यांना भुयारी मार्ग किवा ओव्हर ब्रिज तयार करण्याकरीता निवेदनान्वये मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने भुयारी मार्ग किंवा ओव्हर ब्रिज तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मंजुर विकास योजनेतील १८ मी. रुंद शांतीनगर रस्ता हा जुना आग्रारोड तहसील ऑफीस ते तानसा पाईपलाईन पर्यंत डांबरीकरणाने विकसित केला आहे.

तथापि, मंजुर विकास योजनेत सदर रस्ता तानसा पाईपलाईन ओलांडून भादवड रस्त्याला जुळत असून सदर भागात रस्ता अद्यापपर्यंत अस्तित्वात नसल्याची वस्तुस्थिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) अशा प्रकारचे निवेदन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेला प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने उड्डाणपुलाचे व त्याखालील रस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करुन मिळण्याकामी धोरणात्मक मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव भिवंडी महानगरपालिकेच्या महासभेपुढे सादर केला असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणघाट नगर परिषद (जि.वर्धा) अंतर्गत वना नदीवरील पाणीपुरवठा बंधाऱ्याचे काम पुर्ण होण्याबाबत**

**(३०) ४१३१७ (२५-०४-२०२२). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट नगर परिषद (जि.वर्धा) अंतर्गत वना नदीवरील पाणीपुरवठा बंधाऱ्याच्या जलसंपदा विभागाने ठेव तत्वाच्या आधारावर सादर केलेल्या बंधाऱ्यास तातडीने मंजुरी देण्याची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अमृत योजना अंतर्गत पाणीपुरवठा आणि गडर लाईनचे काम पूर्ण झालेले असून, शासनाकडून जवळपास १८० कोटी रुपयांची निधी प्राप्त झाला असून त्यापैकी ९० टक्के पेक्षा जास्त काम झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अमृत योजनेसाठी लागणाऱ्या बंधाऱ्याचे अंदाजपत्रक जलसंपदा विभागाने DMA कार्यालयाचा दिलेला असून आतापर्यंत हा बंधारा पूर्ण झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अमृत योजनेचा फायदा जनतेला व्हावा या दृष्टीने बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सद्यस्थितीत पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम ९९ टक्के व मलनिस्सारण प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून प्रकल्पास अनुज्ञेय निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत सदर बंधाऱ्याचा प्रस्ताव नगरपरिषदेकडून नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर करण्यात आलेले आहे.

तथापि, सदर प्रस्तावास तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत नगरपरिषदेस कळविण्यात आले आहे.
(४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत वना नदीवरील बंधारा बांधण्याच्या प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीची बैठक दिनांक ०२ मार्च, २०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत वना नदीवरील नवीन बंधाऱ्याच्या संकल्पचित्र (डिझाईन) तयार करून त्यास सी.डी.ओ. नाशिक यांच्याकडून मान्यता घेऊन व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांच्याकडून सदर प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास चालू दरसुचीवर तांत्रिक मान्यता घेऊन शासनास सादर करण्याच्या व बंधाऱ्याबाबतच्या सर्वसाधारण आराखड्यास सी.डी.ओ. नाशिक यांच्याकडून यथार्थीकरण प्राप्त झाल्यावर योजनेचे पुढील संकल्पन अंतिम सविस्तर प्रकल्प अहवालाच्या स्वरुपात सादर करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, हिंगणघाट नगरपरिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

त्यास अनुसरून नगरपरिषदेकडून सदर प्रकल्पाचा प्रस्ताव विहित कार्यपद्धतीनुसार शासनास प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणेसह राज्यातील नव्या गृहनिर्माण प्रकल्पांना प्रिमिअम शुल्कात सवलत देण्याबाबत

**(३१) ४१५५६ (२५-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मागील वर्षी डिसेंबर, २०२१ मध्ये प्रिमिअम शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम व्यावसायिकांना ही सवलत देताना त्याच्या मोबदल्यात संबंधित बांधकाम व्यावसायिकांना ग्राहकांची स्टॅम्प टयुटी (मुद्रांक शुल्क) भरण्याचे बंधन घातले होते, मात्र त्यासाठी ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतची मुदत घातली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परंतु राज्य शासनाने या आदेशाची अंमलबजावणी करण्यास पुणे महापालिकेने ५ महिन्याचा कालावधी घेतल्यामुळे ग्राहकांना या योजनेचा लाभ घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना व त्यामुळे बांधकाम क्षेत्रात आलेली दिरंगाई लक्षात घेता शासनाने निर्णय घेऊन सदर सवलतीस मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) होय.
राज्य शासनाने, कोविड-१९ विषाणूच्या संक्रमणाचा धोका व जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेली जागतिक महामारी यांचा सारासार विचार करुन, राज्यात वेळोवेळी जाहीर केलेली टाळेबंदी आणि या सर्व बाबींमुळे जागतिक स्तरावर आर्थिक व औद्योगिक प्रगतीत आलेली आमुलाग्र शिथिलता या साऱ्यांच्या पार्श्वभूमिवर आर्थिक सुधारणांसाठी

केलेल्या विविध उपाययोजनांपैकी एक म्हणजे रियल इस्टेट क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने शासनाने दि.१४.०१.२०२१ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी तसेच फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये ५०% सवलत देण्याबाबत त्याचप्रमाणे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाव्यतिरिक्त नियोजन प्राधिकरणांमार्फत तसेच इतर प्राधिकरणांमार्फत अन्य बाबींसाठी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये ५०% सूट देण्याबाबत नियोजन प्राधिकरणांनी / इतर प्राधिकरणांनी निर्णय घेण्याबाबत, काही अटींसह, निदेश दिलेले होते. सदर निदेशानुसार दि.३१.१२.२०२१ पर्यंत प्रत्यक्ष जमा होण्याऱ्या अधिमुल्याच्या रकमेवर सूट अनुज्ञेय होती.
(२) होय.
दि.१४.०१.२०२१ रोजीचे निदेशानुसार या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरिता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पुर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते.
(३) पुणे महानगरपालिकेमार्फत दि.१४.०१.२०२१ रोजीचे कार्यालयीन परिपत्रक व दि.०६.०८.२०२१ रोजीचे सुधारित परिपत्रकाप्रमाणे सदर शासन निदेशाची अमंलबजावणी महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडील अधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) व (५) दि.३१.१२.२०२१ पर्यंतचे मुदतीत नियोजन प्राधिकरणांना प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी होणे व मंजूरी होणे प्रलंबित असल्याची बाब विचारात घेऊन, अशा प्रकरणांमध्ये उक्त नमूद मुदतीत अधिमूल्य रक्कम भरणा करणे व्यावहारीकदृष्ट्या शक्य नसल्याने दि.३१.१२.२०२१ पर्यंत मंजूर प्रस्तांवासाठी अधिमूल्याची रक्कम प्रत्यक्ष भरणा करणेसाठी शासन निर्णय दि.३१.१२.२०२१ अन्वये, दि.१४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार भरणा करुन घ्यावयाच्या सवलतीच्या अधिमूल्याबाबतची प्रत्यक्ष भरणा करण्याची मुदत दि.१५.०१.२०२२ पर्यंत वाढविली होती. यानंतर कोविडची वाढती परिस्थिती व त्यामुळे कामकाजावर होणारा परिणाम यांचा विचार करुन दि.१४.०१.२०२२ रोजीच्या निदेशान्वये, सदर मुदत दि.१६.०१.२०२२ ते ३१.०१.२०२२ अखेरपर्यंत वाढविण्यात आली होती.

---

## पुणे शहराच्या हद्दीलगतची २३ गावांतील गुंठेवारीतील बांधकामांना परवानगी देण्याबाबत.

**(३२) ४१५६० (२५-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या हद्दीलगतची २३ गावे पुणे महापालिकेत समाविष्ट करण्यात आाली असून या गावातील बांधकाम परवानगीचे अधिकारी पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाकडे आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या २३ गावांतील गुंठेवारीतील किती बांधकामांना आतापर्यंत परवानगी देण्यात आली आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) होय खरे आहे.
शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२०/प्र.क्र.३२२/नवि-२२, दि.३०.०६.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ करण्यात आलेली असून त्यामध्ये २३ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. तद्नंतर दि.१४.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२१/११६७/प्र.क्र.९८/ २०२१/नवि-१३ अन्वये शासनाकडून पुणे महानगरपालिकेमधील एकुण २३ गावांकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास, महाराष्ट्र प्रादेशिक नियाजेन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१)(घ) अन्वये "विशेष प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार उपरोक्त २३ गावांमध्ये बांधकाम परवानगीचा अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आहे.
(२) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून दि.२३.०२.२०२२ पर्यंत गुंठेवारीतील बांधकामांना परवानगी देण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व सुधारणा अधिनियम, २०२१ मधील तरतूदी व प्राधिकरणाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजना आराखड्यातील तरतुदींची सांगड घालुन गुंठेवारी कायद्यान्वये अनधिकृत बांधकामांना नियमाधीन करणेबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यपध्दती निश्चित करणेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे अहवालात नमूद आहे.

---

**कसबा बावडा (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीपात्रात दूषित पाण्यामुळे ऑक्सिजन कमी पडल्याने हजारो माशांवर परिणाम होत असल्याबाबत**

**(३३) ४१७२९ (०९-०४-२०२२). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबा बावडा (जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीपात्रातदूषित पाण्यामुळे ऑक्सिजन कमी पडल्याने हजारो माशांवर परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीच्या पाण्यात शहरातील सहा नाल्यातील दुर्गधीयुक्त करडया रंगाचे पाणी थेट मिसळत असल्याची बाब दि.२४.१.२०२२ रोजी जिल्हाधिकारी नियुक्त शासकीय अधिका-यांचा समावेश असलेल्या उपसमितीच्या पाहणीत स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नदीपात्राच्या पाण्याच्या तपासणी समितीचा पाहणी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राप्त अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगगाने पंचगंगा नदीपात्राच्या पाणी तपासणी समितीने सादर केलेल्या अहवालानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दुधाळी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व कोल्हापूर महानगरपालिका यांना दिनांक २५/०१/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.

• तसेच मासे मर्तुकीच्या घटनेच्या अनुषंगाने मे. श्री. छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २५.०१.२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस व दिनांक ०३/०३/२०२२ रोजी कारखाना बंद करण्याचे आदेश देऊन विद्युत पुरवठा आणि पाणी पुरवठा खंडित करण्यात आलेला होता.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाजकल्याण विभाग, जळगाव जिल्हा परिषद मार्फत वसतीगृहाच्या अनुदानात झालेली अनियमितता**

**(३४) ४१७३४ (०९-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद जळगाव मार्फत माध्यमिक विद्यार्थी वसतीगृह व अन्य दोन वसतीगृहात स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश देवून अनुदानाची रक्कम ७,६८,२७०/- अदा करण्यात आली असून ४ वसतीगृहामध्ये ७५ टक्क्यांहुन कमी हजेरी असताना देखील त्या विद्यार्थ्यांना १,२६,०००/- रक्कम अनुदान वाटप केले असल्याची घटना सन २०१७-२०१८ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नये असे शासन आदेशात नमुद असताना देखील स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश देवून एकूण रक्कम रुपये ६१,३०५/- नियमबाह्य अदा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, वसतीगृहात खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्या गेला असल्याने रु. ४५,०००/- नाहक खर्च झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) उक्त प्रकरणी चौकशी करण्यात येवून नियमबाहय अदा करण्यात आलेली व दंडाची रक्कम अशी एकूण रू.६७,५००/- इतकी रक्कम सबंधिताकडून वसूल करून शासनजमा करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण (पुर्व) येथील कृष्णा अपार्टमेंट समोर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(३५) ४२०५१ (२५-०४-२०२२). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण (पुर्व) चिंचपाडा रोड कमान जवळ, कृष्णा अपार्टमेंट समोर बनविण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत स्थानिक रहिवाशी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रारी करून सुद्धा कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामास महानगरपालिकेतील काही अधिकारी पाठीशी घालत असून त्यामध्ये त्यांचे हितसंबध व आर्थिक व्यवहार झाल्याने वारंवार स्थानिक नागरिक तक्रार करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
• कल्याण (पूर्व) चिंचपाडा रोड कमान जवळ, कृष्णा अपार्टमेंट समोर बांधण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशी यांनी केलेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्यात येत नाही, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.
(३) अनधिकृत बांधकामाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कार्यवाही केली जाते.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात "प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी" अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व २६७(१) अन्वये नोटीस काढून बांधकाम धारकास "अधिकृतता" दर्शविणारे कागदपत्र सादर करणेबाबत सुनावणी आयोजित करतात.
• सदरचे बाधंकाम अनधिकृत असल्यास बांधकाम धारकास स्वखर्चाने सदर बांधकाम काढून टाकण्याची सूचना दिली जाते.
• सदरचे बांधकाम बांधकामधारकाने मुदतीत काढून न घेतल्यास संबंधित प्रभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते.
• सन २०१५ ते डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत ११४४२ अनधिकृत बांधकामे निष्कासित केली आहेत तर ४५५ अनधिकृत बांधकामधारकांविरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल केले असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण (PMRDA) यांनी अभ्यास न करताच झोनिंग टाकल्याबाबत**

**(३६) ४२१२३ (२५-०४-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण (PMRDA) यांनी चुकीचे झोनिंग टाकल्यामुळे असंख्य तक्रार अर्ज पीएमआरडीएकडे प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मौजे सणसवाडी (ता.शिरुर) नगर रोड चौक येथे लोकवस्ती असून येथे रहिवाशी झोन पडणे आवश्यक होते मात्र तेथे इंडस्ट्रीज झोन टाकला, तसेच खंडाळे हे गाव रांजणगांव एमआयडीसीपासून काही अंतरावरच असूनही या गावात ग्रीन झोन टाकण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्हावरा येथील रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी कारखान्याची उभारणी २५ वर्षापूर्वी झालेली असून या ठिकाणी औद्योगिक झोन टाकणे आवश्यक असतानाही या ठिकाणी ग्रीन झोन टाकलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रावसोबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना येथे औद्योगिक झोन व या परिसरात रहिवाशी झोन टाकणे, नगर रोडच्या कडेला रहिवाशी झोन, उद्योग झोन टाकणे आवश्यक असणे तसेच काही ठिकाणी औद्योगिक वसाहतीजवळ फ्री झोन ठेवणे आवश्यक असतांना तसेच पीएमआरडीए ला दिलेल्या हरकतींबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) पुणे महानगर प्रदेशाची प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना / हरकती मागविणेसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये, दि.०२.०८.२०२१ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. या अनुषंगाने ५९,२९७ अर्जदारांकडून ७१,८४० सूचना / हरकती प्राप्त झाल्या आहेत.

(२) प्रारूप विकास योजनेतील शिक्रापूर नागरी विकास केंद्रामध्ये मौजे सणसवाडी समाविष्ट असून त्या भागातील मंजूर प्रादेशिक योजनेतील औद्योगिक विभाग, अस्तित्वातील औद्यागिक व गोडाउनचा वापर विचारात घेऊन सणसवाडी चौकाला लागून औद्योगिक विभाग प्रस्तावित आहे. मौजे खंडाळे गांव हे ग्रामीण क्षेत्रात समाविष्ट असून, त्यामधील गावठाणाचे क्षेत्र व अस्तित्वातील सुविधांचे क्षेत्र वगळून उर्वरित संपूर्ण क्षेत्र शेती विभागात समाविष्ट आहे. प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार शेती विभागात औद्योगिक वापर अनुज्ञेय आहे.

(३) प्रारुप विकास योजनेत मौजे न्हावरा हे गाव ग्रामीण विकास केंद्रात समाविष्ट आहे. रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी कारखान्याखालील जमीन ही मंजूर प्रादेशिक योजनेत शेती विभागात समाविष्ट असून प्रारुप विकास योजनेत ती हरित विभागात (जी-२) समाविष्ट आहे.

(४) कलम २८(२) च्या तरतूदीनुसार, प्रसिध्द झालेल्या प्रारूप विकास योजनेबाबत प्राप्त झालेल्या सूचना / हरकती बाबत संबंधितांना सुनावणी देऊन अहवाल सादर करण्यासाठी नियोजन समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या अहवालावर कलम २८(४) अन्वये यथायोग्य कार्यवाही करुन नियोजन प्राधिकरण प्रारूप विकास योजना कलम ३० अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास त्या बदलासह उक्त विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करणार आहे. यानंतर नगर रचना संचालनालयाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर विकास योजना छाननी समितीची बैठक आयोजित करण्यात येईल. बैठकीतील शिफारशीच्या अनुषंगाने प्रारूप विकास योजना छाननीअंती शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील समाजकल्याण वसतिगृहातील छात्रभारती संघटनेच्या सभासद विदयार्थ्यानी उपोषण करण्याचा दिलेला इशारा

**(३७) ४२८४१ (०९-०४-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील समाजकल्याण वसतिगृहातील छात्रभारती संघटनेच्या सभासद विद्यार्थ्यांनी वसतिगृह सुरु ठेवा, नाही तर शैक्षणिक भत्ते लागू करा या मागण्यांकरिता आक्रमक भूमिका घेत दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या दरम्यान उपोषणाचा इशारा दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छात्रभारती संघटनेच्या सभासद विदयार्थ्याच्या मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आयुक्त, नाशिक महानगर पालिका यांचे पत्र क्र.५०३, दिनांक ८.२.२०२२ अन्वये स्थानिक प्रशासनाने वसतिगृह सुरू करण्यास परवानगी दिल्याने सहायक आयुक्त, समाज कल्याण, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.४१७, दिनांक ८.२.२०२२ अन्वये वसतिगृहे सुरू करण्यास परवानगी दिलेली असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे ते मुंबई बंद रेल्वेसेवा तातडीने सुरु करणेबाबत

**(३८) ४२९५५ (०९-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनामुळे गत दोन वर्षांपासून धुळे ते मुंबई रेल्वेसेवा बंद करण्यात आली असल्याने धुळे ते मुंबई प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे आणि ज्येष्ठ नागरिकांचे अतोनात हाल होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे येथून मुंबईला जाण्यासाठी स्वतंत्र बोगी असलेली रेल्वेसेवा सुरु करण्याची मागणी धुळे येथील स्थानिकांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२३) :** (१) कोविड-१९ कालावधीत लॉकडाऊन लागल्यापासून रेल्वे बोर्डाच्या आदेशानुसार धुळे ते मुंबई रेल्वे सेवा बंद करण्यात आली आहे. तथापि, प्रवाश्यांच्या सोईसाठी धुळे ते चाळीसगाव दरम्यान ४ जोडी मेमू रेल्वे गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत. चाळीसगावहून मुंबईसाठी दररोज ११ रेल्वे गाड्या उपलब्ध आहेत.

(२) अशी मागणी प्राप्त झाली नसल्याचे अपर जिल्हा दंडाधिकारी, धुळे यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जलयुक्त शिवार योजनेतील तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयास्तरावर स्वतंत्र कक्ष करण्याबाबत**

**(३९) ४३०७० (२९-०३-२०२२). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजनेतील तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येणार असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती जिल्हयामध्ये स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले तसेच सदरहू प्रकरणी किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत,

(३) तसेच सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरील योजनेतील तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयास्तरावर स्वतंत्र कक्ष करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२३) :** (१), (२) व (३)

राज्यात जलयुक्त शिवार योजनेतील तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्ष तयार केलेले नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांबाबत तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती नियमित देणे व वसतीगृहांची संख्या वाढविण्याबाबत**

**(४०) ४३४८१ (०९-०४-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतरमागासवर्गीय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती नियमितपणे वेळेवर मिळत नसल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयार्थ्यांसाठी असलेल्या वसतीगृहांची संख्या कमी असल्याने वसतीगृहांमध्ये प्रवेश मिळण्यापासून अनेक विद्यार्थी वंचित राहत असल्याने तसेच त्यांच्या शिक्षणात अडचणी निर्माण होत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती नियमित देणे व वसतीगृहांची संख्या तातडीने वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :** (१) अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणी हे खरे नाही. परंतु इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रकरणी सन २०२०-२१ या आर्थीक वर्षातील इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती / फ्रिशिप ची रू. ४३० कोटी रक्कम प्रलंबीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकरीता राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, विद्यावेतने व निर्वाह भत्ते या प्रकारचे विविध लाभ वितरीत करण्यांत येतात.

सामाजिक न्याय विभागामार्फत तालुका, जिल्हा व विभागस्तरावर एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमधून प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य व अन्य सोई सुविधा

पुरविण्यांत येतात. तसेच आदिवासी विकास विभागामार्फत राज्य भरात एकुण ४८७ वसतीगृहे चालविण्यात येतात. तरादेखील उपलब्ध क्षमतेच्या प्रमाणात अधिक मागणी असल्याने ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश मिळणे शक्य होत नाही अश्या अनुसूचीत जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून लाभ देण्यात येत आहे तसेच आदिवासी विकास विभागामार्फत देखील संबंधीत विद्यार्थ्यांना पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वंयम याजनेचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोंदिया येथील एम.एल.एम.इंडस्ट्रीजचे शहराबाहेर स्थलांतर करण्याबाबत

**(४१) ४३६९० (०९-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया शहरातील भगतसिंग वार्ड, रेल्वे चौकी मरारटोली येथील एम.एल.एम.इंडस्ट्रीज ही शहराच्या मध्यस्थांनी असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इंडस्ट्रीजचे स्थलांतर करण्याबाबत परिसरातील नागरिकांतर्फे मागील एक वर्षापासून तक्रार करण्यात आली परंतु अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नाधीन विषयाबाबत मा. विधानसभा सदस्य यांनी जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे दाखल केलेली तक्रार त्यांच्या कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०२/०६/२०२० रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानूसार मे. जय अंबे इंडस्ट्रीज हा उद्योग नोव्हेंबर, २०२१ पासून बंद असून इतरत्र स्थलांतरित झालेला आहे. तसेच मे. एम.एल.एम. इंडस्ट्रीज या उद्योगाच्या दिनांक १६/१२/२०२२ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान सदर उद्योग विनासंमती सुरु असल्याचे आढळून आल्याने या उद्योगास दिनांक १९/१२/२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील आणि नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसह पीएमआरडीएच्या टेकड्यांवर डोंगर माथा-डोंगर उतार झोन प्रस्तावित करण्यात आल्याबाबत

**(४२) ४३८०९ (२५-०४-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीतील आणि नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसह पीएमआरडीएच्या सुमारे दोन हजार हेक्टर टेकड्यांचा प्रश्न निर्माण झाला असून या टेकड्यांवर डोंगर माथा, डोंगर उतार झोन प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू डोंगर माथा, डोंगर उतार प्रस्तावाबाबतचा निर्णय राज्य शासनाकडे स्थगित असून जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत टेकड्या तशाच पडून राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास अद्यापही मान्यता न देण्याची कारणे काय आहेत?
(४) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने या प्रस्तावास मान्यता देऊन टेकड्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२२) :** (१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रारुप विकास योजना दि.०२.०८.२०२१ रोजीच्या शासन राजपत्रातील नोटीसी अन्वये प्रसिध्द करण्यात आली असून, त्यामध्ये ५४७.४७ हे. क्षेत्र हिल टॉप - हिल स्लोप विभागात समाविष्ट करण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिकेचा विकास आराखडा दि.०५.०१.२०१७ रोजी मान्य करण्यात आला असून यामध्ये हिल व हिल टॉप - हिल स्लोप असे मिळून जवळपास १३३६.९३ हे. आहे.

(२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील डोंगर माथा, डोंगर उतार विभागसंबंधी विकास योजनेतील प्रस्ताव शासन निर्णय ई.पी.-१६९ नुसार तुर्तास प्रलंबित ठेवला आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी, शासनाने मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली काही बदलासह लागू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर नियमावलीतील हिल टॉप - हिल स्लोप विभागात अनुज्ञेय करावयाच्या वापराबाबतचे नियम प्रलंबित ठेवण्यात आले आहे.

(३) (४) व (५) हिल टॉप - हिल स्लोप क्षेत्र पर्यावरणीय संवेदनशील असल्याने या क्षेत्राचे जतन होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने हिल टॉप - हिल स्लोप झोन व त्याबाबतचे विनियम या संबंधी धोरणात्मक निर्णय शासनस्तरावर विचाराधीन आहे.

---

## मारेगांव तालुक्यातील(जि.यवतमाळ) शासकीय कार्यालयात कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना एकस्तर वेतन श्रेणी लागु करण्याबाबत

**(४३) ४३८६७ (२८-०३-२०२२). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील शासकीय कार्यालयात कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना एकस्तर वेतन श्रेणी व आदिवासी भत्यात वाढ करण्याच्या मागणीसह इतर प्रलंबित मागण्यासाठी दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभागाला मागण्यांचे निवेदन दिले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कर्मचा-यांच्या मागण्याचे स्वरुप काय आहे?

(३) असल्यास, एकस्तर वेतन श्रेणी व आदिवासी भत्ता व इतर मांगण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलबांची कारणे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२२) :** (१) होय.

(२) सदर निवेदनाद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील मारेगांव तालुक्यात असलेल्या शासकीय कार्यालयांमधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी व आदिवासी भत्त्याचा लाभ अनुज्ञेय करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) राज्यातील आदिवासी उपाययोजना क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या भागात सेवारत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी व प्रोत्साहन भत्ता आदी लाभ अनुज्ञेय आहेत.

आदिवासी उपायोजना क्षेत्र घोषित करण्याबाबतची कार्यवाही आदिवासी विकास विभागाकडून केली जाते. प्रश्नाधीन प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार मारेगांव शहर हे आदिवासी उपाययोजना क्षेत्रात येत नाही. त्यामुळे या भागात सेवारत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी व प्रोत्साहन भत्ता इत्यादी लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत.

मारेगांव शहराचा आदिवासी उपाययोजना क्षेत्रात समावेश केल्यास या ठिकाणच्या शासकीय कार्यालयांतील अधिकारी/ कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी व प्रोत्साहन भत्ता आदी लाभ अनुज्ञेय ठरतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरात मुदतबाह्य वाहनांचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४४) ४४६१३ (१७-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सद्य:स्थितीत सुमारे ९० लाख वाहनांची नोंदणी झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण मुंबई प्रदेशातील ३२ लाख वाहनांपैकी १५ वर्षे पूर्ण केलेली किमान १० लाख वाहने रस्त्यावर धावत असून या वाहनांच्या फिटनेसबाबतची माहिती परिवहन विभागाकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुदत उलटून गेलेल्या वाहनांमध्ये मोठया प्रमाणात सार्वजनिक सेवा देणारी वाहने असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वाहनांमुळे मुंबई महानगर क्षेत्रातील वाहनांची मोठया प्रमाणावर होणारी वाहतुक कोंडी सोडवणे तसेच मुदत बाह्य वाहनाचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२२) :** (१) मुंबई शहरात सद्यस्थितीत सुमारे ३२ लाख वाहनांची नोंदणी झाली आहे. दि.१६.०४.२०२२ रोजी दैनिक लोकमतमध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) मुंबई शहरात एकुण ३२ लाख वाहनांपैकी NIC च्या आकडेवारीनुसार मुंबई प्रदेशामध्ये एकुण ३,१७,०४६ वाहनांची १५ वर्षे पुर्ण झाल्याची नोंद आढळते. त्यापैकी २०४८५ परिवहन वाहने व २९६५६१ परिवहनेतर वाहने आहेत.

(३) व (४) योग्यता प्रमाणपत्र अथवा नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण न करता रस्त्यावर चालणा-या वाहनांच्या विरोधात तपासणी मोहिम सातत्याने घेण्यात येते व दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत दंडात्मक कारवाई येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील नागरिकांना भूयारी मेट्रो ३ मार्गाची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) ४४६२३ (३१-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन कडून २०१६ मध्ये मुंबईतील पहिल्या भूयारी मार्ग कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाचे काम हाती घेण्यात आल्यानंतरही अद्याप अनेक कामे प्रलंबीत असल्याने तसेच कार्यमर्यादेचा (dead line) कालावधी तिसऱ्यांना संपल्यामुळे मुंबईतील नागरीकांना उक्त मेट्रोच्या लाभापासून वंचीत रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन कडून २०१६ मध्ये कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाचे काम हाती घेण्यात आल्यानंतर वांद्रे ते सिप्झ पर्यंतचा पहिला टप्पा सन २०२१ तर वांद्रे-कुर्ला संकुल ते कुलाबा पर्यंतचा दुसरा टप्पा सन २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्धीष्ट सुरूवातीला ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाविकास आघाडीच्या काळात सदरहू कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाच्या कामामध्ये अनेक बदल करण्यात आल्यामुळे व काम अत्यंत धिम्या गतीने सुरू असल्यामुळे सदरहू मार्गातील अनेक कामे आजही प्रलंबीत असून दुसरीकडे सदर भूयारी मेट्रो ३ च्या मार्गाच्या अंदाजीत खर्चात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भूयारी मेट्रो ३ मार्गाच्या कामाची सद्यस्थिती काय आहे, या कामावर आज मितीस किती रक्कम खर्च करण्यात आली आहे तसेच एकूण अंदाजीत खर्चात मूळ अंदाजीत खर्चाहून किती अधिक वाढ झाली आहे तसेच

उक्त मेट्रो ३ च्या मार्गाचे काम त्वरीत हाती घेऊन मुंबईतील नागरीकांना पहिल्या भूयारी मेट्रो ३ मार्गाची सेवा कार्यान्वित होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-१२-२०२२) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे,

नियोजनाप्रमाणे प्रथम डिसेंबर, २०२१ मध्ये नागरीकांच्या सेवेमध्ये मेट्रो – ३ दाखल होणार होती. तथापि, देशभरात कोविड-१९ चे संकट आणि कारडेपोच्या जागेची अनिश्चितता असल्याने, तसेच न्यायालयीन प्रकरणामुळे स्थापत्य कामास विलंब व त्याचा प्रभाव प्रणाली कामांवर झाला. या सर्व कारणांमुळे प्रकल्पास विलंब झाला आहे.
(३) विवक्षित कामांमुळे खर्चात वाढ झाली असून, शासनाने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ३३,४०५.८२ कोटी इतक्या रकमेच्या सुधारीत प्रकल्प आराखडयास मान्यता प्रदान केली आहे.
(४) व (५) सद्य:स्थितीत प्रकल्पाची आर्थिक प्रगती ९१.२० % आणि भौतिक प्रगती ७३.३० % इतकी झाली असून,आजमितीस रु.२१,१०२.२१ कोटी एवढा खर्च झाला आहे. प्रकल्प किमतीमध्ये रु.१०,२७० कोटीने वाढ झाली आहे.

---

## राज्य सरकारने एमआरव्हीसीचा एक हजार कोटींचा निधी प्रलंबित असल्याने एमयूटीपी प्रकल्पाला थांबविण्यात आल्याबाबत

**(४६) ४४६२९ (३१-१०-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेशात स्वस्त व जलद वाहतूक उभारण्यासाठी राज्य आणि केंद्र शासन यांच्या समान गुंतवणूकीतून एम.आर.व्ही.सी. ची स्थापना करण्यात आली आहे. मात्र सन २०२० पासून आर्थिक स्थिती बिकट असल्याचे कारण देऊन राज्य शासनाने एम.आर.व्ही.सी. चा एक हजार कोटींचा निधी प्रलंबित ठेवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई लोकलचे संपूर्ण वातानुकूलीकरण करण्यासाठी १९१ वातानुकुलीत लोकलची बांधणी करण्यात येणार असून, माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये रेल्वे मंत्रालयाने या लोकलच्या बांधणीला मंजूरी दिली आहे. तसेच यासाठी आंतरराष्ट्रीय कंपन्यांची सकारात्मक बैठक झाली असून त्यांनी लोकल बांधणीची तयारी दर्शविली आहे. मात्र राज्य शासनाकडून निधीच्या माध्यमाने अडवणूक करण्यात येत असल्याने एम.यू.टी.पी.तील सर्वच प्रकल्प थांबविण्यात आले असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशात विरार-डहाणू चौपदरीकरण आणि पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय मार्गाचे काम सुरू आहे या कामातील कंत्राटदारांची ५५० कोटींची देयके निधी नसल्याने एम.आर.व्ही.सी. ने अदा केलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मध्य आणि हार्बर रेल्वेवरील १० स्थानके व पश्चिम रेल्वेवरील ८ स्थानकांत सुधारणा करण्यात येणार असून या सुधारणा करण्यासाठी निविदा पूर्व तयारी पूर्ण झाली असून, मात्र निधी नसल्याने निविदा मागविण्यात येणार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, एम.यू.टी.पी. प्रकल्पाची प्रलंबित कामे विनाविलंब हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण होण्याकरीता राज्य शासनाने एमआरव्हीसीचा एक हजार कोटीचा प्रलंबित ठेवलेला निधी विनाविलंब अदा करण्याच्या दृष्टीने कोणती ठोस उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२२) :**(१) अंशतः खरे आहे.

मुंबई उपनगर रेल्वे सेवेच्या समक्षीकरणासाठी रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या समप्रमाणातील वित्तीय सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळातर्फे टप्पा-१,२,३ व ३अ विविध टप्प्यामध्ये मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) राबविण्यात येत आहेत. एमयुटीपी टप्पा-१ व २अ प्रकल्पांची कामे यापूर्वीच पूर्ण करण्यात आली आहेत. एमयुटीपी-२ब, ३ व ३अ प्रकल्पांची कामे प्रगतीच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत.

एमयुटीपी-२ व ३ प्रकल्प किंमतीतील कर्जाचा भाग वगळता उर्वरित निधी राज्य शासनाचे वतीने एमएमआरडीए व सिडकोमार्फत वहन करण्यात येत आहे. सन २०२०-२१ मधील कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च व महसूल प्राप्तीतील घट यामुळे एमयुटीपी प्रकल्पासाठी वेळेवर निधी उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण झाल्या.

एमयुटीपी-२अ प्रकल्पाच्या रु.५३०० या मूळ मंजूर किंमतीमध्ये रु.२३३३ कोटी रेल्वेने त्यांच्याकडील जमिनीचे विकसन करून उभारणे आवश्यक होते. तथापि रेल्वे विभागाकडून याप्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

राज्य शासनाने एमयुटीपी-१ प्रकल्पासाठी रु.२२५० कोटी तर एमयुटीपी-२ साठी आतापर्यंत रु.३३४५.५८ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. एमयुटीपी-३ प्रकल्पावर आतापर्यंत झालेल्या खर्चापोटी आतापर्यंत सुमारे रु. ५२७.३५ कोटी इतका निधी उपलब्ध केला आहे.

(२) एमयुटीपी-३अ प्रकल्पांतर्गत १२ डब्यांच्या १९१ वातानुकुलित रेल्वे गाड्या खरेदी करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सद्यस्थितीत विरार-डहाणू चौपदरीकरण आणि पनवेल-कर्जत कामांच्या कंत्राटदारांची कोणतीही देयके प्रलंबित नाहीत. राज्य शासनाकडून एमयुटीपी प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला असल्याने एमआरव्हीसीकडून १८ स्थानकांत सुधारणा करण्यासाठी निविदा प्रक्रियेच्या कामाला गती देण्यात आली आहे.

सन २०२०-२१ मधील कोविड-१९ चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवरील खर्च व महसूल प्राप्तीतील घट यामुळे एमयुटीपी प्रकल्पासाठी वेळेवर निधी उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. तथापि, पुढील काळात आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

---

## मुंबई वांद्रे येथील १२० ते १३० मिटर उंचीचा आकाशपाळना (मुंबई आय प्रकल्प) उभारण्याबाबतच्या निर्णयाबाबत

**(४७) ४४७२३ (१०-११-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे येथील १२० ते १३० मिटर उंचीचा आकाशपाळना (मुंबई आय प्रकल्प) उभारण्याच्या निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी, २०२२ मध्ये व त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प उभारण्यासाठी नेमलेल्या सल्लागार यांनी अद्याप राज्य शासनास अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवाल तयार करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व प्रकल्प उभारण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे, खरे आहे.

दिनांक १० मे, २०२१ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६८ व्या बैठकीमध्ये मुंबई आय प्रकल्पाबाबत व्यवहार्य पूर्व अभ्यास करणे, तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करणे, जागेची निवड करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा करणे व एजन्सीच्या निवडीसाठी निविदा प्रक्रिया व्यवस्थापन राबविणे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणे याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यास मंजूरी दिली होती.

तथापि, सल्लागारामार्फत विहित मुदतीत प्रकल्प अहवाल प्राधिकरणास प्राप्त न झाल्यामुळे सल्लागाराचा कार्यादेश रद्द करण्यात आला. सदर कार्यादेशातील नमूद अटी व शर्तीनुसार सल्लागाराची अनामत रक्कम तसेच बँक हमी जप्त करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्पाकरीता सुयोग्य जागेचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु असून, सुयोग्य जागा प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीबाबतची पुढील कार्यवाही करण्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा मानस आहे.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यात अनधिकृतपणे भुखंडाची विक्री सुरु असल्याबाबत

**(४८) ४४८६१ (२५-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यात अनधिकृत रेखांकन सक्षम प्राधिकारी यांची विकसन परवानगी आणि विकास आराखड्यास मंजुरी न घेता अनधिकृतपणे भुखंडाची विक्री सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संबंधित विकासकांना नोटीस देऊनही अनधिकृतपणे भुखंडाची सर्रास विक्री सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील पीएमआरडीएच्या हद्दीतील सर्व गावांचे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-१२-२०२२) :** (१) (२) (३) (४) व (५) होय हे खरे आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अनधिकृतपणे भूखंडांचे विकसन व त्यामध्ये अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानुसार त्यांचे सर्व्हेक्षण करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये कारवाई करण्यात येते.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये हवेली, मावळ, मुळशी, खेड, शिरूर, भोर, वेल्हा, दौंड व पुरंदर या ९ तालुक्यांचा अंतर्भाव असून एकूण ८१४ गावांचा समावेश आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत प्राधिकरण कार्यक्षेत्रामधील एकूण १५२ अनधिकृत प्लॉटिंगचा / विकसन कामांचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून एकूण ९६ अनधिकृत भूखंड विकसकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (६) (अ) अन्वये नोटीशींचे अनुपालन न केल्यामुळे ता. हवेली मधील २, ता. मावळ मधील ४, ता. खेड मधील १ अशा एकूण ७ अनधिकृत प्लॉटधारक / विकांसकावर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून १७ अनधिकृत विकांसकावर गुन्हे दाखल करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत, तसेच प्राधिकरणामार्फत ३ प्लॉटिंगमधील अंतर्गत रस्ते, साईट ऑफिस, सीमाभिंत, कमान व जाहीरात फलक यांचे निष्कासन करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

---

## नवी मुंबई व मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत

**(४९) ४५१०२ (२५-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या ७४ शाळांमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढत आहे मात्र शाळांच्या प्रशस्त इमारतीमध्ये सुरक्षेच्या उपाययोजना करण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने हजारो विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आली असल्याची बाब माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांच्या इमारतीमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी सुमारे चार वर्षापूर्वी महासभेने मान्यता देवून ही अद्याप सीसीटीव्ही न बसविण्याची सर्वसाधारण कारणे काय तसेच महापालिका शाळांमधील शिपाई आणि सुरक्षा रक्षकांना अद्यापही गणवेश दिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील खाजगी, विनाअनुदानित शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे प्रमाण ८७ टक्के असले तरी महानगरपालिका शाळांमध्ये मात्र अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे तसेच शाळांमधील शिपाई, सुरक्षा रक्षक यांना गणवेष, ओळखपत्र आणि इतर आवश्यक गोष्टीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या इमारतींमध्ये, शाळेच्या आवारात व प्रवेशद्वारावर सी.सी.टी.व्ही. बसविणे व देखभाल व दुरूस्ती करणे या कामाकरीता सन २०१८-१९ पासून ७ वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर निविदांना निविदाकारांकडून मिळणारा अल्प प्रतिसाद व कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झाला, ही वस्तुस्थिती आहे.
• तथापि, सध्या दि.१०.०५.२०२२ रोजी निविदा मागविण्यात आल्या असून, सदर निविदेकरीता एकूण १५ निविदाकारांकडून सादर केलेल्या कागदपत्रांची तांत्रिक छाननीअंती एकूण ४ निविदाकारांच्या निविदा पात्र झालेल्या आहेत.
• पात्र निविदाकारांच्या वित्तीय दराचे लिफाफे उघडण्यात आले असून, न्युनत्तम दरपत्रक असलेल्या निविदाकारास कार्यादेश देण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
• नवी मुंबई महानगरपालिका शाळांमधील शिपाई व सुरक्षा रक्षकांसाठी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत निविदा प्रक्रियेद्वारे बहुउद्देशीय कामगार पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार कंत्राटदारामार्फत संबंधितांना गणवेश व ओळखपत्र पुरविले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय सेवेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे व्यपगत करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबतच्या शासन निर्णयात विसंगती असल्याबाबत

**(५०) ४५१९६ (२५-०९-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचे (सा.प्र.विभाग) दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी व शर्ती तसेच त्यांना शासकीय सेवेत नियमित करण्याबाबतच्या तरतुदी आदेशित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासन सेवेतील कार्यरत चतुर्थश्रेणी पदे व्यपगत करण्याचा व या पदांवर मानधन पध्दतीने कंत्राटी कर्मचारी भरण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासन निर्णयानुसार, आदिवासी विकास विभागामध्ये दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ कंत्राटी किंवा रोजंदारी कर्मचारी म्हणून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत मा. न्यायालयाच्या निकालास अधिन राहून, आदिवासी विकास विभागाने त्यांचे स्तरावर तसा शासन निर्णय निर्गमित केला असल्याचे दिनांक २० एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाच्या अन्य शासन निर्णयानुसार, सेवेतील चतुर्थश्रेणी पदे व्यपगत करण्यात येवुन यापुढे ती पदे मंजुर पदांच्या यादीमधून वगळण्यात येवून ही पदे मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत, तर दुसरीकडे आदिवासी विकास विभागाने दहा वर्षे सेवा पुर्ण करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे राज्य शासनाच्या दोन्ही विभागांमध्ये (सा.प्र.विभाग व आदिवासी विकास विभाग) परस्पर विसंगती असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर शासन निर्णयातील विसंगती दूर करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे तसेच कंत्राटी वा रोजंदारी पध्दतीवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडुन शासकीय कामकाज पध्दतीची गोपनियता कशी पडताळली जाणार आहे,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२२) :** (१) दिनांक ११ डिसेंबर, २०२० रोजी अशा स्वरुपाचा कोणताही शासन निर्णय शासनाकडून निर्गमित करण्यात आलेला नाही,
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.